
ISBN : 978-93-82588-56-6

# PROCEEDINGS
# NATIONAL CONFERENCE ON SOCIAL SCIENCES & COMMERCE

## 27th December 2014












- Chief Editor : Prof. Virag S. Gawande
- Editor : Dr. Vijay K. Tompe
- Editor : Dr. Sanjay J. Kothari

Jointly organised by

G. S. Tompe Arts, Commerce & Science College, Chandur Bazar
& Aadhar Social Research & Development Training Institute, Amt.

# INDEX

## SECTION (A) - MARATHI



| | Author | Title of Research Paper | Pg .No. |
|---|---|---|---|
| 1 | प्रा. अशोक बहादुरे | राज्य पूनर्रचना आणि राज्यांचे राजकारण | 1 |
| 2 | प्रा. अशोक धोंडिबा बिडगर | जागतिकीकरणानंतरच्या भारतातील सुधारणा | 4 |
| 3 | प्रा.डॉ.स्वप्ना एस. देशमुख | वृध्दावस्थेतील स्त्रियांची जीवनशैली | 7 |
| 4 | प्रा. डॉ. राजेंद्र यादोराव खंडाईत | मध्ययुगीन भारतीय इतिहासाची साधने | 11 |
| 5 | प्रा.वाय.एस.माहुरे | जर्मन जनतेची सहज प्रवृत्ती म्हणजे नाझी तत्वज्ञानाचा उदय होय | 18 |
| 6 | प्रा. कमलेश एस. मानकर | भारतातील विकासात्मक समस्या | 22 |
| 7 | प्रा. विशाखा के. मानकर | भारतीय कुटुंब संस्थेतील समस्या | 25 |
| 8 | प्रा. श्रीरंग बाबुराव पाटील | दहशतवाद | 29 |
| 9 | प्रा. जयंत मा. बनसोड | जागतीकीकरणातील भारतीय बँकींग अर्थव्यवस्था | 33 |
| 10 | प्रा. रोडे तुकाराम किसन | राजकोषिय आणि चलनविषयक धोरण | 38 |
| 11 | सचिन चापके | जागतिक सैनिकी व्यय, मानव विकास आणि सहस्त्राब्दि विकास लक्ष्य | 41 |
| 12 | प्रा. डॉ. सी.पी. साखरवाडे | ग्रामिण अर्थव्यवस्था आणि सेंवा क्षेत्रातील वृध्दी | 46 |
| 13 | प्रा.संध्या.ज.माने. | लोकशाही विकेंद्रीकरण आणि महिलांचे राजकीय सक्षमीकरण | 48 |
| 14 | महाजन संजय बाबुराव | ऊर्जा सुरक्षितता आणि बारावी पंचवार्षिक योजना | 52 |
| 15 | प्रा.डॉ. प्रदीप दामोदरराव दरवरे, | जागतिकीकरण आणि भारतीय शेती | 59 |
| 16 | प्रा.इन्दु ह. राठी (जाजू) | अन्न संरक्षण – आधुनिक काळाची गरज | 63 |
| 17 | प्रा. सौ. अल्का अ. दहीकर | अन्न सरंक्षण | 67 |
| 18 | प्रा. देवकाते बी. एन. | मध्ययुगीन भारताचा इतिहास – साधने एक अभ्यास | 73 |
| 19 | प्रा. लुलेश्वर धरमसारे | मिनहाज उस सिराज इनकी : :तबकात-ए-नासिरी: पुस्तक एक मध्ययुगिन ऐतिहासिक स्त्रोत | 77 |
| 20 | माधुरी.म.देशमुख | *शासनाचे माहीतीचे धोरण ई. गव्हर्नन्स* | 83 |
| 21 | प्रा.एम.पी.चोपडे | भारताचे मौद्रिक धोरण आणि राजकोषीय धोरण | 87 |
| 22 | प्रा. डॉ. प्रमोद ना. घ्यार | 19 व्या शतकातील सामाजिक चळवळी | 91 |
| 23 | प्रा. दिनेश निचित | अमरावती जिल्हयातील आत्महत्याग्रस्त शेतक–याची स्थिती व शासकिय उपाययोजना. | 95 |
| 24 | प्रा. डॉ. प्रशांत ज. काटोले | केंद्रीय अंदाजपत्रक वर्ष २०१४ - १५ : तरतूदी आणि वास्तव | 98 |
| 25 | प्रा.किशोर शेषराव चौरे | आधुनिक भारताच्या जडणघडणीत 19 व्या शतकातील सामाजिक व धार्मिक सुधारणा चाळवळींचा प्रभाव | 101 |
| 26 | प्रा.एन.डब्ल्यु.हंबर्डे | जागतिकीकरण, उदारीकरण व भारतीय औद्योगिक क्षेत्र | 105 |
| 27 | प्रा.ओंकार एम.बोरेकर | बेरोजगारी हेच दारिद्रयाचे मुळ कारण एक अवलोकन | 108 |
| 28 | प्रा.पी.एस.फाळके | स्त्री भृणहत्या - एक सामाजिक समस्या | 112 |
| 29 | प्रा.डॉअनिल डी. पवार | नाशिक जिल्ह्यातील मानवी संसाधने व विकास | 117 |

ISBN-978-93-82588-56-6

# मध्ययुगीन भारतातील फारसी इतिहास लेखन

डॉ. वाय.एम. साळुंके
कला विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय ओझर (मिग) ता. निफाड जि. नाशिक

मध्ययुगीन भारताच्या इतिहास लेखणानाची प्रक्रिया पहिली असता असे दिसते की, ही प्रक्रिया प्राचीन भारताच्या इतिहास लेखनाच्या मुघल पुर्व प्रक्रिगेशी मिळती जुळती नाही. मुस्लिग आक्रमन व तुर्कांची राज्ये हा भारतीय इतिहासामधील महत्त्वाचा टप्पा आहे. मध्ययुगिन इतिहास लेखणात वैश्विक इतिहास प्रादेशिक व स्थानिक इतिहास, संदर्भ साधने, व्यक्ती व आत्मचरित्रे प्रशासकिय वृत्तपत्रे इ. प्रवाह दिसून येतात. मध्य आशीया कडुन भारतावर झालेली इस्लामी आक्रमणाने भारतावर पार्शियण म्हणजे फारसी भाषेचा प्रभाव झाला. त्यामुळेच भारतीय मुस्लीम राज्यकर्त्यांनी फारसी भाषा ही दरबारी भाषा म्हणून स्विकारली होती. त्यामुळे फारसी भाषेत मोठया प्रमाणात कागदपत्रे जमा होत गेली.

मोहम्मद गझनी च्या भारतावरील आक्रमणापासून हाजारो तुर्की, अफगान व इराणी लोक भारतात वसाहत करण्यासाठी आले या लोकांनी आपल्या बरोबर फारसी भाषा आणल्याने इ.स. १५ व्या व १६ व्या शतकापर्यंत भारतात सर्वत्र फारसी भाषेचा प्रभाव निर्माण झाला. उदा. मराठे शाहीतील शिवकालीन इतिहासात मराठी पत्रांमध्ये फारसी शब्दांचा शिरकाव झाला. फारसी साधनांचा उपयोग आदिलशाही, कुतूबशाही व मोगल कालखंडाच्या अभ्यासासाठी होतो. तारीख-ए-फिरोजशाही

**तारिख-ए-फिरोजशाही :-**

शियाउद्दीन बरनी या लेखकाने इ. स. १३५७ मध्ये पूर्ण केला. या ग्रंथात बल्बनच्या शासन काळाच्या प्रारंभापासूनच फिरोज तघुलकच्या शासन काळातील ६ व्या वर्षापर्यंत (१३५७) चा ऐतिहासिक आढावा आहे. बरनीने इतिहासाची उपयोगिता, इतिहासकारांचे कर्तव्य इ. बाबत प्रस्तुत ग्रंथात आपली भुमिका मांडली आहे. या ग्रंथात सुलतान फिरोजशहा तुघलकच्या काळातील सर्व घटनांचा उल्लेख आहे. या ग्रंथात एकुण ८ सुलतांनाचा इतिहास आहे. डॉ. ईश्वरीप्रसादर यांच्या मते, उल्लाउद्दीन खिलजीच्या बाजार नियंत्रण धोरणाची व फिरोज शहा तुघलकाच्या प्रशासनाची प्रशंसा करीतो. "मध्यकालीन इतिहासकारांत बरनी हाच एकमेव इतिहासकार असा आहे की, जो सत्यावर भर देतो व राजांची खोटी स्तुती करत नाही". बरनीचा हा ग्रंथ ९५ वर्षांच्या सल्तनत काळाच्या इतिहासावर प्रकाश टाकतो.

**बाबरनामा:-**

हा मुळ ग्रंथ तुर्की भाषेत होता: पण त्याचे नंतर फारसी भाषेत भाषांतर झाले होते. मोगल बादशहा बाबर याला आपली मातृभाषा तुर्कीचा अभिमान होता. त्याने आपले आत्मचरित्र तुर्की भाषेत लिहिले आहे. त्याच्या दरबारात फारसी भाषेच्या बरोबरीने तुर्कीला मान होता, पण हुमायूनच्या काळात मोगलांनी तुर्की भाषेचा वापर खासगी व्यवहारापुरता मर्यादित केला. साहित्य व राजकारण यासाठी फारसीचा उपयोग सुरू केला. अकबराचा काळ फारसी भाषेचे सुवर्णयुकग मानला जातो.

**तारीख-ए-फिरोजशाही :-**

या ग्रंथात फिरोजशहा तुघलक (इ.स.१३५७-१३८८) चा इतिहास शम्स-ए-सिराज अफीफ याने लिहिला आहे. तो फिरोजशहा तुघलकचा निकटवर्तीय व दरबारातील उच्च पदस्थ अधिकारी होता. त्यामुळे अमीर वर्ग व प्रशासन यासंबंधि विस्ताराने लिहिले आहे. या ग्रंथाचे ५ भाग आहेत. प्रत्येक भागात १८ अध्याय आहेत. या ग्रंथाच्या ५ भागांत फिरोजशहा तुघलकाचे चरित्र, युध्द

ISBN-978-93-82588-56-6
अभियान, शासन व्यवस्था, महसूल व्यवस्था, युध्दे, रस्ते, धार्मिक नीती व फिरोजशहा तघुलकाच्या दरबाराचे वर्णन आहे. या ग्रंथात काही दोषही आहेत. उदा. घटनांचे वर्णन क्रमबध्द नाही, ऐतिहासिकदृष्टया मुळीच महत्त्व नसलेल्या घटनांची वर्णने देणे, ग्रंथाची भाषा अलंकारिक असणे. डॉ. ईश्वरीप्रसाद लिहितात, शम्स-ए-मिराज अफीफ यांच्यात इतिहासकाराची योग्यता नव्हती. (१)

**तुजुक-ए-जहांगिरी:-**

या ग्रंथाचा लेखक स्वत: जाहांगीर हा होता. या ग्रंथाचे संपादन १८८३ मध्ये सय्यद अहदमखान यांनी केले. या ग्रंथामुळे जहांगीराच्या काळातील प्रशासन व्यवस्थेची महत्त्वपुर्ण माहिती मिळते. तसेच खुस्त्रो, शहाजहान व महाबतखान यांच्या बंदाचीही विस्तृत माहिती मिळते. नूरजहानचे चरित्र, प्रभाव, राजनैतिक चातुर्य यावरही हा ग्रंथ प्रकाश टाकतो. जहांगिरच्या काळातील मोगल-राजपूत संबंध, जहांगिरचे धार्मिक धोरण, मेवाड विजय इ. ची माहिती या ग्रंथात लेखकाने दिली आहे. जहांगिरीने केलेल्या मुख्य सामंत व अधिकाऱ्यांच्या केलेल्या नियुक्त्या, बदल्या, पदच्युती इ. चेही वर्णन या ग्रंथात आहे. जहांगिराने या आत्मचरित्रपर ग्रंथात आपले दोष लपवलेले नाहीत. आपण मद्य व इतर मादक पदार्थांच्या सेवनात कसे फसलो होतो हे त्याने लिहिले आहे. भारतातील विविध प्रदेशांचे भौगोलिक वर्णनही दिले आहे. जहांगीरचा शासन कालखंडाचा इतिहास जाणून घेण्यासाठी ग्रंथ महत्त्वाचा मानला जातो. जहांगिराने आपलया राजवटीची पहिली १७ वर्षांची कारकीर्दत या ग्रंथात नगूद केली आहे. जहांगीर इ. स. १६०५ ते १६२७ या काळात सत्तेवर होता. प्रस्तुत ग्रंथात जहॉगीरने आपल्या पित्याविरूध्द केलेले बंड, राजकुमार खुस्त्रोची हत्या यासंबंधी मात्र ग्रंथात लिखाण केले नाही.

**हुमायूनामा :-**

बाबरची कन्या गुलबदन बेगम हिने आपला भाऊ हुमायूनच्या आठवणी हुमायूननामा या ग्रंथात लिहिल्या आहेत. अकबराच्या सांगण्यावरून हा ग्रंथ गुलबदन बेगमने इ. स. १४९८ ते ९० च्या दरम्यान लिहिला. गुलबदन बेगमने आपल्या ग्रंथाचे २ भाग पाडले होते.

प्रस्तुत ग्रंथात तिने युध्दांचे फारसे वर्णन केले नाही. बाबरची दानशूनता, त्याचे परिवाराबद्दलचे प्रेम व एकुण बाबराची माहिती प्रस्तुत ग्रंथात आली आहे. हुमायूनच्या युध्द मोहिमा, तत्कालीन सामाजिक सामाजिक व सांस्कृतिक जीवन याची माहिती या ग्रंथातून मिळते, सामाजिक समकालीन ग्रंथात जी माहिती नाही ती या ग्रंथात नोंदविली आहे. आपल्या भावांची तत्कालीन शाही परिवारातील विवाहविधींची माहिती या ग्रंथात आहे.

**शहाजहाननामा :-**

मोहम्मद ताहीर या शहाजहानच्या काळातील एका मनसबदाराला इनायतखान ही उपाधी मिळाली होती. तो शहाजहानचा खूप जवळचा मित्र होता. शहाजहानच्या आदेशानुसारच त्याने शहाजहाननामा हा ग्रंथ लिहिला या ग्रंथात इ. स. १६५८ पर्यंतचे शहाजहानच्या काळचे ऐतिहासिक विवरण आहे. या ग्रंथात ज्या घटनांचे वर्णन आहे त्या विश्वसनीय आहे. याची प्रचीती इतर ग्रंथांवरूनही येते. शहाजहानच्या काळचा इतिहास जाणून घेण्यासाठी हा ग्रंथ उपयोगाचा आहे.

**आलमगीरनामा :-**

मिर्झा मोहम्मद काजीम याने इ.स. १६८८ मध्ये हा ग्रंथ लिहिला औरंगजेबने या ग्रंथाच्या लेखकास मुन्शी या पदावर नियुक्त केले होते. त्यामुळे शासनासंबंधी सर्व रोकॉर्ड पाहण्याची सोयही होती. ग्रंथलिखाणास प्रारंभ झाल्यानंतर त्याचे हे इतिहासलेखन पसंत न पडल्याने औरंगजेबाने थांबवले. हा ग्रंथ औरंगजेबच्या १६५८-१६६८ या १० वर्षाचया काळाची माहिती देतो.

ISBN-978-93-82588-56-6
या ग्रंथात त्याने औरंगजेबची स्तुती केली आहे तर औरंगजेबच्या दुर्देवी भावावी टर उडवली आहे. हा ग्रंथ पक्षपाती आहे त्यामुळे तो पुर्णपणे विश्वसनीय नाही.

**पादशाहनामा :-**

अब्दुल हमीद लाहोरी हा शहाजहानकडून इतिहासलेखन करण्यासाठी नेमलेला इतिहासकार होय. अबुल फझलने ज्याप्रमाणे अकबरनामा हा ग्रंथ लिहिला तसाच आपल्यावरही ग्रंथ असावा असे शहाजहानला वाटले म्हणून त्याने अब्दुल हमीद लाहोरीची नियुक्ती केली होती. त्याने लिहिलेला पादशहानामा हा ग्रंथ फारच मोठा आहे व त्याची पृष्ठसंख्या १६६२ पाने इतकी आहे. या ग्रंथात बादशहच्या कार्याचे अत्यंत विस्तृत सामंतांना दिलेल्या पदव्या इ. चीही माहिती आहे. इलियन व डाऊसन याने भारताचा इतिहास खंड ७ मध्ये या ग्रंथाचा अनुवाद दिला आहे. हा ग्रंथ म्हणजे शहाजहानच्या कारकर्दीचा अधिकृत इतिहास आहे. (२)

**नुश्ता-ए-दिलकुशा :-**

भीमसेन सक्सेनांचा नुश्ता-ए-दिलकुशा हा फारसी ग्रंथ औरंगजेबच्या शासन काळावर प्रकाश टाकणारा महत्त्वपूर्ण ग्रंथ आहे. भीमसेन सक्सेनाचे वडील इ.स. १६५७ मध्ये औरंगाबाद येथे तोफखानाप्रमुख होते. तेथेच तो फारसी भाषा शिकला. औरंगजेबचा सेनापती दलपसिंह बुंदेला याच्या नेतृतवाखलील मोगल सैन्यात भीमसेन सक्सेना याने कारकून सेवा केली. त्यांचा नुश्ता-ए-दिलकुशा हा ग्रंथ ऐतिहासिकदृष्ट्या खूपच महत्त्वाचा आहे. भीमसेन सक्सेना याने औरंगजेबच्या वेळच दक्षिण भारत व उत्तर भारतातील परिवर्तन, घटनांची कारणे व परिणाम याचे विस्तृत वर्णन केले आहे. तो हिंदू असूनही त्याने फारसीत लेखन केले आहे. मोगलांच्या राजधानीपासून दूर असल्याने त्याच्या लिखाणात बादशहाला हस्तक्षेप करता आला नाही. एक तटस्थ इतिहास काराप्रमाणे त्याने औरंगजेबकालीन घटनांची कारणे, परिणाम ग्रंथात दिले आहेत. औरंगाबाद शहराची बरीच माहिती त्याने या ग्रंथात दिली आहे. औरंगजेबच्या दक्षिण मोहिमेचे विस्तृत वर्णन त्याने या ग्रंथात दिले आहे. त्यावेळेच्या खाद्यापदार्थांच्या किमती, रस्त्यांच्या दशा, सामाजिक जीवन, मनोरंजनाची साधने इ. ची. माहिती तो देतो. १७ व्या शतकाचा इतिहास त्यांच्या ग्रंथातून स्पष्ट होतो.

**तारीख-ए-शेरशाही :-**

या ग्रंथाची रचना १५७९ मध्ये झाली. या ग्रंथाचा लेखक अब्बसखान सरवानी हा शेरशाह सूरचा समकालीन होता. त्याकाळात अफगाणांनी जे ग्रंथ लिहिले त्यात या ग्रंथास विशेष महत्त्वा आहे. शेरशहासंबंधी जेवढी माहिती या ग्रंथात मिळते तेवढी इतर समकालीन ग्रंथांत मिळत नाही. या ग्रंथाचे ३ भाग आहेत. या ग्रंथात शेरशहाच्या सुधारणांचे विस्तृत वर्णन आहे. लेखकाने शेरशहाच्या न्यायव्यवस्थेची प्रशंसा केली आहे. या ग्रंथात घटनांचा विधीक्रम दिला नाही. लेखकास भौगोलिक ज्ञान नाही. शेरशहाची तो आवश्यकतेपेक्षा अधिकच स्तुती करतो वगैरे दोष या ग्रंथात असले तरी सूर वंशाच्या इतिहासंबंधी विस्तृत माहिती या ग्रंथात आहे.

**फुतूहान-ए-आलमगिरी :-**

ईश्वरदास नागर हा हिंदू इतिहासकार असूनही त्याने फारसी भाषेत फुतूहात-ए-आलमगिरी हा ग्रंथ लिहिला. इ.स. १७०१ मध्ये त्याने आपले लेखन पूर्ण केले. तो गुजरातचा नागर ब्राम्हण होता. त्याने गुजरातचा सुभेदार शुजातखान याचा विश्वास प्राप्त बकेला होता. औरंगजेबकालीन बऱ्याच घटना त्याने स्वत: पाहिल्या होत्या. या ग्रंथात त्याने औरंगजेबकालीन १६५७-१७०० या काळातील घटनाचा इतिहास लिहिला. हा ग्रंथ ऐतिहासिकदृष्या अत्यंत महत्त्वाचा आहे. त्याचा ग्रंथ राजकीय इतिहासाबरोबर सामाजिकव सांस्कृतिक जीवनावर प्रकाश पडतो. औरंगजेबच्या धार्मिक धोरणावरही त्याने प्रकाश टाकला आहे. राठौर व मोगल यांच्यातील युध्दाची

या ग्रंथात माहिती आहे. या ग्रंथात अनेक किल्ल्यांचे क्षेत्रफळ, त्यातील तोफा यांचेही वर्णन आहे. या ग्रंथात काही उणिवा असल्या तरी औरंगजेबकालीन घटना जाणून घेण्यासाठी एक समकालीन व विश्वसनीय ग्रंथ म्हणून या ग्रंथास विशेष महत्त्व आहे.

**किताब-उल-रहला :-**

इब्न बनुताचा या ग्रंथात तुघलक वंशाचा इतिहास समजतो या लेखकाने ग्रंथात भारताची भौगोलिक स्थिती, सामाजिक स्थिती, दैनंदिन जीवन, स्त्री जीवन, विवाहसंस्था, मृत्यूनंतरच्या जीवनासंबंधी साधू-संतांच्या भारतीयांच कल्पना, मंत्र-तंत्र, जादूटोणा, मनोरंजन, टपाल व नाणी, आर्थिक जीवन, सामान्य प्रशासनं, दळणवळण, व्यापार, उद्योग, शेती, पिके, राष्ट्रीय महामार्ग, नौदल, वजने व मापे, विविध पदार्थ इ. ची माहिती दिली आहे. त्याने दिली आहे. महमंद तुघलकाचे गुण जसे तो वर्णन करतो त्याप्रमाणे त्याच्या क्रौर्याचेही वर्णन त्याने केले आहे. लष्करी प्रशासन, न्यायसंस्था, ग्रामप्रशासन इ. ची माहिती त्याने दिली आहे. कोणतेही आकस किंवा पूर्वग्रह न ठेवता त्याने हा ग्रंथ लिहिला आहे. १४ व्या शतकाचा भारताचा इतिहास जाणून घेण्यासाठी हा ग्रंथ उपयोगाचा आहे. (३)

**सरहिन्दीचा तारीख-ए-मुबारकशाही :-**

प्रस्तुत ग्रंथातून मोहम्मद घोरीच्या शासन काळापासून सय्यद वंशाच्या माहितीसाठी समकालीन ग्रंथ म्हणून या ग्रंथाचे महत्त्व आहे. हा ग्रंथ अहमद अब्दुल्लाह या लेखकाने सय्यद वंशाचा राजा मुइज्जुद्दीन अबुल फत्तह मुबारकशहा (इ.स. १४२१-३३) यास अर्पण केला आहे. फिरोज तघलकाचे उत्तराधिकारी व सय्यद सुलतानांचा इतिहासावर प्रकाश टाकणारा हा ग्रंथ आहे.

**अकबरनामा :-**

अबुलफझल हा मोगल बादशहा अकबराच्या दरबारातील इतिहासलेखक, विद्वान, राजकारणी,

सेनापती मुत्सद्दी होता. आकबराने अबुल फझलला मोगल साम्राज्याचा इतिहास लिहिण्याची सूचना केली. एक आव्हान म्हणून त्याने हे काम स्वीकारले. अत्यंत परिश्रमपूर्वक त्याने अकबरनामा हा ग्रंथ प्रसिध्द केला. या ग्रंथाचे ३ भाग असून त्यात अकबराच्या राज्यकारभाराचा विस्तृत इतिहास आहे. त्याला हा ग्रंथ ५ भागांत लिहावयाचा होता. पण त्यापैकी फक्त ३ भागचा तो पूर्ण करू शकला.

पाहिल्या भागात तैमूरपासून हुमायूनापर्यंतचा इतिहास आहे. दुसऱ्या भागात अकबराच्या कारकीर्दीतील अबुल फझलच्या मृत्यू पर्यतच्या घटनांचे वर्ण आहे. तिसरा भाग आईन-ए-अकबरी म्हणून प्रसिध्द आहे. आईन-ए-अकबरीचे ५ विभाग आहेत. पहिल्या दोन भागात बादशहा, त्याचे कुटूंब, दरबार, नोकरचाकर, त्यांची कामे इत्यादीचा आढावा घेतला आहे.

**मुन्तखब-उल-लुबाब:-**

महंमद हशीम खाँ ऊर्फ खाफीखान हा औरंगजेबच्या कालखंडातील मोगल दरबारातील प्रसिध्द इतिहासकार होय. मुन्तखब-उल-लुबाब किंवा तारीख-ए-खाफीखान हा त्याचा ग्रंथ होय. या ग्रंथात मोगलांच्या आगमनापासून ते इ. स. १७३३ पर्यंतच्या सर्व गोष्टी दिल्या आहेत. या ग्रंथातच मोगल सत्तेचा ऱ्हास का झाला हेही सांगितले आहे. मोगल सत्तेच्या ऱ्हासाला तुर्रानी अमीर यास या ग्रंथात जबाबदार धरले आहे. खाफीखानाचे वडील हेही इतिहासकार होते. खाफीखानने औरंगजेबच्या काळात उच्च राजकीय व लष्करी पदावर काम केले होते. खाफीखानला पश्चिमी भारताची चांगली माहिती असल्याने गुजरातच्या मोगल सुभेदाराने त्यास मुंबईला विशेष कामगिरीवर पाठवले होते. खाफीखान हा शियापंथीय होता.

ISBN-978-93-82588-56-6
तारीखे-ए-खाफीखान किंवा मुन्तखब-उल-लुबाब हा खाफीखानचा ग्रंथ अत्यंत महत्त्वाचा आहे. औरंगजेबने तो सत्तेवर आल्यानंतर ११ व्या वर्षी त्यावेळच्या घटनांचा प्रस्तुत ग्रंथात उल्लेख न करण्यासंबंधि खाफीखानला सांगितले होते, परंतु खाफीखानने गुप्तपणे आपले लिखाण चालूच ठेवले होते.

खाफीखान स्वत: म्हणतो, इतिहासकाराने उच्च आदर्शाचे पालन केले पाहिजे. इतिहासकार सत्यवादी असला पाहिजे. त्याने कोणत्याही फायद्याची आशा करू नये. पक्षपाती किंवा द्वेषाची भावना त्याने ठेवू नये. मित्र किंवा अपरिचित असा भेदभाव न करता इतिहास काराने लिखाण करावे. खाफिखानने आपला हा ग्रंथ व्यक्तिगत अनुभवांवर आधारित लिहिला आहे.

मोगल सैनिकांच्या लष्करी मोहिमा व त्याची फलनिष्पत्ती याचे विस्तृत वर्णन खाफिखाने त्याच्या ग्रंथात केले आहे. मोगलांचे महसूल वसूल करणारे अधिकारी कसे निर्दयी, भ्रष्ट होते व ते जासत महसुल कसा जमा करत, गरीब शेतकऱ्यांना कसे लुटत, सरकारची संपत्ती कशी हडप करत याबाबत त्याने आपली तीव्र नाराजी/खंत व्यक्त केली आहे. अशा अधिकारी वर्गावर तो टिका करतो. त्यांची निंदा करतो. बहादुरशहाच्या काळात मोगल साम्राजाच्या पतनाची पक्रिया सुरू झाली. (४)

खाफिखाने प्रशासकिय दोष मांडले त्याशिवाय सम्राट व श्रीमंतांकडून कला व साहित्याची जी सेवा झाली त्यावरही तो प्रकाश टाकतो. फारसी भाषेतुन हिंदुस्थानचा इतिहास लिहिणारे जे मुस्लिम विद्वान लेखक आहेत त्यात खाफिखानचे स्थान महत्त्वाचे आहे. तरीही १८ व्या शतकातील प्रारंभीच्या काळातील समकालीन इतिहास कारांप्रमाणे लष्करी मोहिमांचे वर्णन लिहिताना कारणे व परिणाम यांचा समन्वय जोडण्याचा प्रयत्न त्याने केला नाही. हे दोष मान्य करूनही मुन्तखब-उल-लुबाब हा खाफिखानचा ग्रंथ एक उत्कृष्ट इतिहासग्रंथ आहे. औरंगजब, बहादूरशहा प्रथम, जहांदरशहा, फर्रूखसियर व मुहम्मदशहाच्या कालखंडाची १४ वर्षे यांच्या अभ्यासासाठी हा ग्रंथ नक्कीच उपयोगाचा आहे.

थोडक्यात मध्ययुगिन काळातील फारसी इतिहास लेखन मध्ययुगिन इतिहासावर प्रकाश टाकते हा इतिहास बरासा कालक्रमानुसार दिसतो त्यामुळे तात्कालिन घटनांची सुसंगती लावण्यास सोपे होते.

**संदर्भ साधने**

१) गाठाळ एस. एस., इतिहासलेखक शास्त्र, कैलाश पब्लिकेशन, प्रथम आवृत्ती, औरंगाबाद.
२) डॉ. सरदेबाई बी. एल., इतिहास लेखण पध्दती, फडके प्रकाशन, कोल्हापुर.
३) डॉ. देव प्रभाकर, इतिहास एकशास्त्र्ज्ञ, कल्पना प्रकाशन, नांदेड.
४) कोठेकर शांता, इतिहास तंत्र आणि तत्वज्ञान, साईनाथ प्रकरण, नागपूर.